**ठळक बातम्या**

- आयआयएम अर्थात भारतीय व्यवस्थापन संस्था सुधारणा विधेयक २०२५ ला संसदेची मंजुरी / ऑनलाइन गेमिंगबाबतचं विधेयक लोकसभेत मंजूर

- उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांचा उमेदवारी अर्ज दाखल

- छत्तीसगडमधे २९ नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण

**आणि**

- महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पावसाची संततधार, पूरपरिस्थितीमुळे १० जणांचा मृत्यू, उद्यासाठी ठाणे, पुणे, नाशिक, सातारा जिल्ह्याला रेड अलर्ट

<><><><>

IIM, अर्थात भारतीय व्यवस्थापन संस्था सुधारणा विधेयक, २०२५ ला संसदेची मंजुरी मिळाली आहे. लोकसभेत हे विधेयक आधीच मंजूर झालं होतं. आज राज्यसभेतही त्याला मंजुरी मिळाली. बिहारमधल्या मतदार याद्यांच्या पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर विरोधकांनी आजही संसदेच्या दोन्ही सभागृहात गदारोळ केल्यामुळे कामकाज वारंवार, आणि शेवटी दिवसभरासाठी तहकूब झालं.

लोकसभेत आज इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रमोशन अँड रेग्युलेशन ऑफ ऑनलाईन गेमिंग विधेयक २०२५ सादर केलं. चर्चेनंतर ते मंजूर करण्यात आलं. ई-स्पोर्ट्स, शैक्षणिक आणि सामाजिक गेम्स यासह ऑनलाइन गेमिंग क्षेत्राला चालना देणं आणि त्यावर नियमन आणणं, हा या विधेयकाचा उद्देश आहे. याद्वारे गेमिंग क्षेत्राबाबत राष्ट्रीय पातळीवर एक कायदेशीर चौकट तयार केली जाईल. तसंच कोणत्याही प्रकारे ऑनलाईन गेम्सद्वारे सेवा, जाहिरातींच्या रूपानं पैशांच्या देवाणघेवाणीवर पूर्ण बंदी करायची तरतूद या विधेयकात आहे. तसंच या कायद्याचं उल्लंघन केल्यास तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि एक कोटी रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही अशा शिक्षेची तरतूद हे विधेयक करतं.

हे विधेयक मंजूर झाल्यानंतर लोकसभेचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. कामकाज पुन्हा सुरु झाल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ‘घटना दुरुस्ती विधेयक २०२५’, ‘केंद्रशासित प्रदेश सरकार विधेयक, २०२५; ‘जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना विधेयक’, २०२५ लोकसभेत मांडलं.

<><><>

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांनी आज संसद भवनात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राजनाथ सिंह, जे. पी. नड्डा, किरेन रिजिजू यांच्यासह भाजपा रालोआतल्या घटक पक्षांचे खासदार उपस्थित होते. सी. पी. राधाकृष्णन हे एक उत्कृष्ट उपराष्ट्रपती असतील, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपला समाज माध्यमावरच्या संदेशात व्यक्त केला आहे.

उपराष्ट्रपती पदाची निवडणूक पुढच्या महिन्याच्या ९ तारखेला होणार आहे. माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी हे इंडिया आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार आहेत.

<><><>

ओदिशातल्या चंडीपूर इथं आज अग्नी ५ या मध्यम पल्ल्याच्या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी झाली. या प्रक्षेपणामुळे सर्व तांत्रिक आणि कार्यात्मक बाबींची पडताळणी झाल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. हे प्रक्षेपण स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांडच्या नेतृत्वाखाली झालं.

<><><>

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी रशियातल्या काही विद्वानाशी आणि विचारवंतांशी चर्चा केली. यावेळी त्यांनी भारत रशिया यांच्यातले परस्पर नातेसंबंध, जागतिक भूराजकीय परिस्थिती आणि भारताची भूमिका याविषयी चर्चा केल्याचं आपल्या समाज माध्यमावरच्या नोंदीत म्हटलं आहे. व्यापार, अर्थ, विज्ञान, तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक सहकार्य यावर दोन्ही देशांदरम्यान २६ वे आंतरशासकीय सत्र आज होत आहे, जयशंकर त्याचं सहअध्यक्षस्थान भूषवतील.

<><><>

जीएसटी सुधारणांच्या पुढच्या टप्प्यामुळे भारताचा आत्मनिर्भर भारत बनण्याच्या प्रवासाला सुरुवात होईल, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे.

भरपाई उपकर, आरोग्य आणि आयुर्विमा आणि दर सुसूत्रीकरणासाठी स्थापन केलेल्या मंत्र्यांच्या गटाला त्या नवी दिल्ली इथे संबोधित करत होत्या. सामान्य माणूस, शेतकरी, मध्यमवर्ग तसंच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना दिलासा देणं, एक पारदर्शक आणि विकासकेंद्री कर व्यवस्था सुनिश्चित करणं हे या करांचं उद्दिष्ट आहे.

<><><>

माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या ८१व्या जयंतीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज त्यांना आदरांजली वाहिली आहे. नवी दिल्लीत वीरभूमी इथं राजीव गांधी यांच्या समाधीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी पुष्पांजली वाहिली. संसदेच्या मध्यवर्ती सभागृहातही लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्यासह इतर सदस्यांनी राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली.

मुंबईत राजभवनात देखील राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून त्यांना अभिवादन करण्यात आलं. त्यानंतर सर्व उपस्थितांना सद्भावना प्रतिज्ञा देण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात अधिकारी, कर्मचारी यांना सद्भावना दिनाची प्रतिज्ञा दिली.

<><><>

छत्तीसगडच्या दंतेवाडा आणि नारायणपूर जिल्ह्यांमध्ये १० महिला नक्षलवाद्यांसह एकंदर २९ नक्षलवाद्यांनी आज आत्मसमर्पण केलं. त्यांच्यावर सुमारे ५५ लाख रुपयांचं इनाम होतं. राज्य सरकारच्या पुनर्वसन धोरणानुसार आत्मसमर्पण केलेल्या प्रत्येक नक्षलवाद्याला ५० हजार रुपये इतकी रक्कम प्रोत्साहन निधी म्हणून दिली गेली. सरकार त्यांना कौशल्य विकास आणि शेतीचं प्रशिक्षणही देणार आहे.

<><><>

मुंबई आणि रत्नागिरीत पावसाचा जोर आज सकाळा ओसरू लागला असला तरी अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर कायम असल्यानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. अनेक धरणांमधून विसर्ग सुरु आहे.

राज्यातल्या अनेक नद्या धोक्याच्या पातळीच्या वरून वाहत असून प्रशासनानं नागरिकांना सतर्क राहण्याचं आवाहन केलं आहे. पूरपरिस्थितीमुळे राज्यात गेल्या २४ तासांत १० जणांचा मृत्यू झाल्याचं राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागानं सांगितलं आहे.

राज्यात जिथं आवश्यकता आहे तिथं राज्यस्तरीय आणि केंद्रस्तरीय आपत्ती निवारण दलाची मदत दिली जाईल असं मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी म्हटलं आहे.

हवामान विभागानं उद्यासाठी **ठाणे, पुणे, नाशिक आणि सातारा** जिल्ह्याला रेड अलर्ट, तर **मुंबई, पालघर आणि रायगड** जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे.

**<><><><>**

ऑस्ट्रेलियामधल्या मेलबर्नमधे वर्ल्ड ऑडिओ व्हिडीओ एँड एंटरटेनमेंट समिटला आज सुरुवात झाली. या समिटमुळे भारत आणि ऑस्ट्रेलियातील ५० फिल्ममेकर्स एकत्र येतील. यामुळे गुंतवणूक संधी,  सहनिर्मिती, जागतिक वितरण सहकार्य आणि ज्ञानाची देवाणघेवाण वाढेल असं भारतीय वाणिज्य दूतावासानं म्हटलं आहे. यावेळी भारताचं राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ आणि ऑस्ट्रेलियाच्या राष्ट्रीय चित्रपट आणि ध्वनी अभिलेखागार यांच्यात एक करार झाला.

**<><><><>**

दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यावर आज सकाळी सुरु असलेल्या जनसुनावणीदरम्यान हल्ला झाला. या आरोपीला पकडण्यात आलं असून, त्याची चौकशी सुरु आहे. दरम्यान रेखा गुप्ता यांची प्रकृती स्थिर असल्याचं दिल्ली भाजप अध्यक्ष वीरेंद्र सचदेव यांनी सांगितलं आहे. भाजपानं या हल्ल्याचा निषेध केला आहे. तर दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री आतिषी यांनीही या हल्ल्याबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे.

लोकशाहीत प्रश्न विचारण्याचा तसंच आदोलन करण्याचा अधिकार आहे, मात्र कोणालाही हिंसा करण्याचा अधिकार नसल्याचं आतिषी यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

यू आय डी ए आय अर्थात भारतीय विशेष ओळख प्राधीकरणानं आज आधार आधारित ग्राहक पडताळणीसाठी खासगी उपग्रह आधारित सेवा प्रदाता कंपनी स्टारलिंकसोबत सहकार्य करार केला. स्टारलिंकद्वारे आधारचं प्रमाणीकरण केल्यामुळे भारताची डिजिटल पायाभूत सुविधांबाबतची विश्वासार्हता वाढते, असं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><>**

येत्या २९ ऑगस्ट पासून बिहार इथे होणाऱ्या पुरुषांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेसाठी भारताचा १८ सदस्यीय संघ आज जाहीर झाला. हरमनप्रीत सिंग हे संघाचे कर्णधार असणार आहेत. पुढच्या वर्षी हॉकी विश्व चषक स्पर्धा बेल्जीयम नेदरलँड इथं होणार आहेत. त्याची पात्रता फेरी म्हणून या स्पर्धेकडे पाहिलं जातं. जपान, चीन, कझाकस्तान हे अन्य स्पर्धक असून २९ तारखेला भारताचा मुकाबला चीनशी होणार आहे.

<><><><>

मुक्त व्यापार करारासाठी वाटाघाटी सुरू करण्यासाठी आज भारत आणि युरेशियन इकॉनॉमिक युनियन यांनी संदर्भ अटीवर स्वाक्षरी केली. युरेशियन इकॉनॉमिक युनियनमधे अर्मेनिया, बेलारुस, कझाकिस्तान, किरगीज रिपब्लिक आणि रशिया यांचा समावेश आहे.

//<><><><>//